17 APR 2022
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. डी.वाय. पाटील यांना डॉ. कणबरकर पुरस्कार प्रदान

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** 'पद्मश्री' डॉ. डी.वाय. पाटील यांनी बहुजन समाजघटकांत आधुनिक शिक्षण वृद्धीचे मोलाचे कार्य केले, असे गौरवोद्गार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी बुधवारी येथे काढले.

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा 'प्राचार्य रा.कृ. कणबरकर पुरस्कार' शाहू महाराज यांच्या हस्ते आज डॉ. डी.वाय. पाटील यांना (शाल, श्रीफळ, मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि १ लाख ५१ हजार रुपये) प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, शांतादेवी डी. पाटील, डॉ. संजय डी. पाटील उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, की प्राचार्य कणबरकर या माझ्या गुरूंच्या नावे असणारा पुरस्कार मिळाल्याने उपकृततेची भावना मनी दाटली आहे. पूर्वी गुरुदक्षिणा दिली जायची, पण आज गुरूकडून शिष्याचा सन्मान झाला आहे, हे या पुरस्काराचे वेगळेपण आहे. त्यांनी पुरस्काराच्या रकमेत आणखी १० लाख रुपयांची भर घालून तो निधी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करून विद्यापीठात संत साहित्याच्या क्षेत्रात प्रभावी काम करणाऱ्या व्यक्तींसाठी पुरस्कार योजना निर्माण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. रणधीर शिंदे यांनी डॉ. पाटील यांच्या मानपत्राचे वाचन केले. प्राचार्य डॉ. बी.ए. खोत यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा अंतिम टप्प्यात

- ४६० परीक्षांचे निकाल घोषित
- २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा लवकरच

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर (हिवाळी सत्राच्या) परीक्षा अंतिम टप्प्यात आल्या आहेत. आजअखेर ४६० परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत. निकाल जाहीर करण्याचे प्रमाण ९५ टक्के आहे.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा १४ फेब्रुवारीपासून सुरू झाल्या आहेत. विद्यापीठ, महाविद्यालयांकडून ६६४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या जात आहेत. कार्यक्षेत्रातून २ लाख २० हजार विद्यार्थी परीक्षा देत आहेत. यात विद्यापीठाच्या ३६२ परीक्षा व महाविद्यालय व क्लस्टर पद्धतीने काही अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे. विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या बहुतांश परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. काही अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया उशिरा झाल्या आहेत. शिक्षणशास्त्र, बीएड., एम.एड., एमबीए आदी विविध २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा एप्रिल-मे महिन्यात परीक्षा विभागाच्या वतीने घेण्यात येणार आहेत. त्यानंतर तत्काळ संबंधित परीक्षांचे निकाल जाहीर केले जातील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठातून...